जनतेचा आवाज... सत्यांची साथ !

सामाजिक बांधिलकीची नवी दिशा

# मल्हार न्यूज

◆ सत्य ◆ समाज ◆ विकास ◆ लोकशाही ◆ जनहित

मल्हार न्यूज
सत्यमागी... सर्वासाठी...

मंगळवार दि. 11/09/2026 संपादक : अनिल चौधरी विचार • कृती • परिवर्तन

# विद्यार्थ्यांना सायबर - डिजिटल सुरक्षिततेचे धडे

## १४ शाळांमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती; २८०० हून अधिक विद्यार्थी सहभागी



सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रमात सहभागी विद्यार्थीनी. (छायाचित्र : मल्हार न्यूज)

**पुणे :** विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा आणि सुरक्षित डिजिटल वापराबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या सायबर वॉरियर्स वैष्णवी कडू आणि अर्पिता रामदास चव्हाण यांनी Quick Heal Foundationच्या 'Cyber Shiksha for Cyber Suraksha' या उपक्रमांतर्गत विविध शाळांमध्ये सायबर सुरक्षा जनजागृतीपर १४ सत्रे यशस्वीपणे घेतली. या उपक्रमाच्या माध्यमातून इयत्ता ५वीपासून ते वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील २८०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचवण्यात आला.

या सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, फिशिंग, मासबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडिया सुरक्षितता, डिजिटल गोपनीयता तसेच इंटरनेटचा जबाबदारीने वापर याबाबत मार्गदर्शनन करण्यात आले. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहावा यासाठी त्यांच्या वयोगटानुसार सोप्या आणि संवादात्मक पद्धतीने विविध उदाहरणे व उपक्रमांचा वापर करण्यात आला.

आजच्या डिजिटल युगात वाढत्या सायबर धोक्यांपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती विद्यार्थ्यांपर्यत पोहोचवणे आणि त्यांच्यामध्ये 'सतर्क रहा, सुरक्षित रहा' ही भावना निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या अनधा वैद्य आणि विभागप्रमुख रूपाली सराफ यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. तसेच शिक्षक समन्वयक मनाली सपकाळ यांचेही मौल्यांचे सहकार्य मिळाले.

Quick Heal Foundationच्या 'Cyber Shiksha for Cyber Suraksha' या उपक्रमाच्या माध्यमातून सायबर वॉरियर्सनी विविध शैक्षणिक स्तरांवरील विद्यार्थ्यांपर्यंत डिजिटल सुरक्षिततेचा संदेश पोहोचवण्यांचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

**'सतर्क रहा, सुरक्षित रहा — डिजिटल जगात सक्षम व्हा !'**